ISSN

2018-19

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

April-2019 Special Issue – 171 (F)

## Commerce

**Guest Editor:**
Dr. Vijaysinh Sawant,
Principal,
D. P. Bhosale College, Koregaon
Dist. Satara [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue:**
Dr. S. S. Pawar
Mr. D. D. Patil

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 171 (F)- Commerce
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019



| | | | |
|---|---|---|---|
| 25 | भारतातील क्रांतीकारी करसुधारणा | डॉ. शिवाजी भोसले | 149 |
| 26 | वस्तू आणि सेवा कर व भारतीयअर्थव्यवस्था | डॉ. अमित शेटे | 153 |
| 27 | वस्तू आणि सेवा कर एक दृष्टीक्षेप | प्री.आर.एम.पठाण | 156 |



*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (F)- Commerce
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

# वस्तू आणि सेवा कर एक दृष्टीक्षेप

श्री.पठाण आर.एम.
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली.
(शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर संलग्न)

**प्रस्तावना:**

विद्यमान युगात सरकारच्या उत्पन्न आणि खर्चाला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.सार्वजनिक आयव्ययाच्या इतकीच सार्वजनिक उत्पन्नाची बाजू ही अत्यंत महत्वाची आहे.दिवसेंदिवस शासकीय खर्च वाढत आहे.आज जगातील बहुतेक राज्य कल्याणकारी राज्य(थशश्रषरीश डींरींश)बनली आहेत.त्यामुळे देशाच्या विकासाची जबाबदारी शासनावर येऊन पडते.आजच्या परिस्थितीत सरकारला फार मोठी कामे करावी लागतात.आणि त्यासाठी प्रचंड प्रमाणावर पैसा खर्च करावा लागतो.त्यासाठी सरकारला निरनिराळ्या साधना पासुन मोठ्या प्रमाणावर उत्पन्न गोळा करावे लागते.सार्वजनिक उत्पन्न मिळविण्याचे निरनिराळे स्त्रोत आहेत.परंतू या सर्वामध्ये कर या साधनालाच सर्वाधिक महत्व आहे.कारण विविध करापासुन मिळणारे एकूण उत्पन्न अन्य साधना द्वारे मिळणाऱ्या उत्पन्ना पेक्षा कितीतरी जास्त असते.सार्वजनिक उत्पन्नाच्या वाढीसाठी कर हे सरकारच्या अखत्यारीतील प्रभावी व हुकमी साधन आहे.केंद्र व राज्य सरकार अनेक करांच्या माध्यमातून उत्पन्न गोळा करते.सरकारने काही नवीन कर चालू केले व काही कालावधी नंतर बंद देखील केले.केंद्र व राज्य सरकार वेगवेगळे कर आकारीत असल्यामुळे भारतात कराच्या उत्पन्नावरून वेगवेगळ्या प्रकारचे तंटे व समस्या निर्माण झाल्या आहेत.यावर उपाय म्हणून अलिकडे लागु केलेला कर म्हणजे वस्तू व सेवा कर होय.हा कर लागु करण्यासाठी संसदेला घटना दुरूस्ती करावी लागली आहे.या कराच्या माध्यमातून भारतात एकच कर प्रणाली लागू झालेली असून राज्य व केंद्र सरकार यांनी लागु केलेले जवळ-जवळ १७ वेगवेगळे अप्रत्यक्ष कर बंद झाले आहेत.

**उद्दिष्ये:**

१) वस्तु आणि सेवा कर प्रणाली समजून घेणे.
२) वस्तु आणि सेवा कर प्रणालीचे फायदे व भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम जाणून घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम माहिती स्त्रोताचा वापर केलेला असून विविध संदर्भ ग्रंथ व वर्तमान पत्रातील लेखांचा तसेच संशोधनपर लेख व वेब साईटचा त्यात आधार घेण्यात आलेला आहे.

**अभ्यासाचे महत्व:**

देशात लागु झालेल्या वस्तु आणि सेवा कर प्रणाली विषयी अनेकांच्या मनात शंका आहे.त्या दुर करण्याचा छोटासा प्रयत्न या निबंधात आहे.

**वस्तु आणि सेवा कर:**

जी.एस.टी.(गुडस् ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स) किंवा मराठीत ज्याला वस्तु आणि सेवा कर म्हटल जात.त्या बाबत अनेक महिणे नव्हे,तर अनेक वर्षा पासुन चर्चा सुरू होती.अप्रत्यक्ष करासंबंधीची ही कर प्रणाली आहे.या कर प्रणाली मुळे देशातील बहुतांश अप्रत्यक्ष कर या कर पद्धतीत अंतर्भुत झाले आहेत.व त्या जागी केवळ

ISSN : 2348-7143
April-2019

एकच कर लागु झाली आहे.सरकारच्या मते या कर प्रणाली मुळे उत्पादन आणि सेवा पुरवठादार यांना विविध अप्रत्यक्ष कराशी जो सामना करावा लागतो तो यामुळे बंद होईल.तसेच कराचा दर रास्त होणार असल्याने कर चुकवेगीरी पेक्षा कर भरणी कडे वाढता कल राहील.प्रत्येक पुरवठादाराने त्याने केलेल्या पुरवठ्यावर पूर्ण कर आकारायचा आणि शासनाला कर भरते वेळी खरेदीवर लागु झालेल्या कराची वजावट घेऊन बाकीची रक्कम शासनाला भरायची.बाहेरून आयात केलेल्या वस्तु व सेवावर कर लागेल आणि खरेदी व आयातीवर भरलेल्या कराची नेहमीच वजावट मिळेल.नविन कर रचनेचे हे संक्षिप्त वर्णन आहे.सर्व आर्थिक उलाढाली दोन पद्धतीने होत असतात असे समजले तर एक म्हणजे वस्तुची विक्री आणि दुसरी म्हणजे सेवांचा पुरवठा.या दोन्ही उलाढालीवर एकत्रित कर लावला की तो वस्तु व सेवा कर होय.जगभर मान्य झालेली व १६० देशात कार्यरत असलेली ही कर प्रणाली आहे.नवीन गुंतवणूक,उद्योग व्यापार,सेवा क्षेत्र या सर्वांना चालना देणारी ही प्रणाली आहे.एकच बाजार आणि एकच कर यामुळे कर व्यवस्थेतील किचकटपणा आणि गुंतागुंत जाऊन ती अधिक सरल व पारदर्शक होईल असा अंदाज आहे.तसेच एकच कर असल्यामुळे कर चोरी पकडण देखील सुलभ होणार आहे.ही कर प्रणाली पुर्णपणे ऑनलाईन किंवा संगणीकृत असणार आहे.त्यामुळे गडबड घोटाळा होण्यास फार कमी वाव आहे असे धोरणकर्त्यांचे मत आहे.

**वस्तु आणि सेवा कर इतिहास:**

जवळपास गेली १५ वर्ष या कर प्रणालीवर विचार मंथन सुरू होत.डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली सन २००३ मध्ये नेमण्यात आलेल्या टास्क फोर्सने सर्व प्रथम ही संकल्पना आपल्या अहवालात मांडली होती.व्हॅटच्या तत्वावर आधारीत एकीकृत वस्तु व सेवा कराची ही संकल्पना होती.या संकल्पनेवर पुढील काळात विचार विनिमय,चर्चा,जाहीर चर्चा व ऊहापोह झाला.२००६ मध्ये तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी.चितंबरमं यांनी त्यांच्या अर्थसंकल्पी भाषणात या संकल्पनेचा उल्लेक केला होता.व साधारणपणे सन २०१० मध्ये याची अंम्मलबजावणी करण्याची मुदत ठरवण्यात आली होती.सन २००९ मध्ये या विषयावरच्या चर्चेसाठीचा एक दस्तऐवज जारी करण्यात आलेला होता.त्याच्याच जोडीला राज्याच्या अर्थमंत्र्यांची एक समिती नेमून या संकल्पनेवर विचार विनिमयाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.या समितीचे अध्यक्ष पद मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाचे नेते आणि पश्चिम बंगालचे तत्कालीन अर्थमंत्री असीमदास गुप्ता यांच्याकडे देण्यात आले होते.त्यांनीच या विधेयकाचा किंवा कर प्रणालीचा पाया घातला होता.त्यानंतर सन २०११ मध्ये जीएसटी लागु करण्यासंबंधीच विधेयक प्रथम मांडण्यात आल.ते नंतर संसदीय स्थायी समितीकडं पाठवण्यात आल.सन २०१३ मध्ये या समितीने आपला अहवाल दिला.परंतु दरम्यानच्या काळात गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी या विध्येयकाला विरोध करण्याची भुमिका घेतली होती.त्या वेळी ते म्हणाले होते.हे विधेयक राष्ट्र हिताच नाही व ते मी कधीही संम्मत होऊ देणार नाही.नंतर लोकसभेच्या हालचाली सुरू झाल्या व हे विधेयक माग पडल.नंतर सन २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि त्यांनी स्वत: हे विधेयक कस राष्ट्र हिताच आहे अस सांगून त्याचा पाठपुरावा करण्यास सुरूवात केली.सन २०१५ मध्ये भाजपा सरकारने आपल्या संख्या बळावर हे विधेयक लोकसभेत मंजूर करून घेतल.परंतु राज्य सभेत कॉंग्रेसने ते अडवून धरल होत.शेवटी सरकारन विचार विनिमयाचा व सामोपचाराचा मार्ग अवलंबून हे विधेयक १२२ व्या घटना दुरूस्ती द्वारे राज्य सभेत संम्मत करून घेतल.

राज्य सभेने १२२ व्या घटना दुरूस्तीद्वारे जे वस्तु व सेवा कर विषयक विधेयक संम्मत केल ते आधारभुत व पायाभुत विधेयक आहे.या विधेयकामुळे या कर पद्धतीचा मार्ग खुला झाला आहे.१९८

पानी विधेयकात संभाव्य कर पद्धतीचा आराखडा देण्यात आला आहे.उदा.राज्याच्या अर्थमंत्र्यांच्या समावेश असलेल्या जीएसटी कौन्सिलची स्थापना किंवा रचना,कोणते अप्रत्यक्ष कर या मध्ये अंतर्भुत असतील,ते कसे अंतर्भुत केले जातील,या कर पद्धतीत कोणत्या सेवा आणि वस्तु येतील वगैरे तपशील यात देण्यात आला आहे.

ही कर प्रणाली लागु झाल्यानंतर संक्रमण काळात राज्यांना जे महसुली नुकसान होणार आहे त्याची भरपाई केंद्राने करावयाची आहे.केंद्र सरकारने पहिल्या पाच वर्षासाठी १००% नुकसान भरपाई राज्यांना देणे आहे.या कर प्रणालीत केंद्राचे केंद्रीय अबकारी शुल्क(सेंट्रल एक्साईज ड्युटी)अतिरीक्त अबकारी शुल्क,सेवा कर,अतिरीक्त आयात शुल्क(काऊंटर व्हेलींग ड्युटी)विशेष अतिरीक्त आयात शुल्क(स्पेशल अॅडीशनल ड्युटी ऑफ कस्टम)व राज्याचे व्हॅट विक्री कर,करमणूक कर,केंद्रीय विक्री कर,ऑक्ट्रॉय आणि प्रवेश कर,खरेदी कर,सुखसोई विषयक कर,लॉटरी,सट्टा आणि जुगाराचे कर विलीन होतील.

राज्यशासनाच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा भाग विक्री करातून मिळतो.या कर आकारणीत अनेक दोष निर्माण झाले होते.त्यावरील उपाय म्हणून मुल्यवर्धीत प्रणाली सन् २००० मध्ये लागु केली होती.या कर प्रणालीत वस्तुच्या फेर विक्रीवर कर आकारण्याची पद्धत होती.ही कर प्रणाली चांगली असली तरी ती प्रत्यक्षात अवतरणे फार कठीण होते.भारतातील २९ राज्ये आणि ६ केंद्र शासित प्रदेश या सर्वांचे स्वत:चे विक्रीकर कायदे होते.प्रत्येक शासनाने वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तुंना कर सवलती दिल्या होत्या.त्यामुळे मुल्यवर्धीत कर प्रणाली सर्व देशभर सुरळीतपणे चालू ठेवणे कठीण होते.प्रत्येक राज्याचे कराचे दर वेगवेगळे होते.त्यामुळे काही लोक वस्तु दुसऱ्या राज्यातून खरेदी करून आणत होते.तसेच नवीन उद्योगांना काही राज्यांनी कर सवलती दिल्या होत्या.त्यामुळे राज्याच्या महसुलात तुट येत होती.यावर १ एप्रिल २००५ मध्ये २१ राज्यांनी नवीन कर प्रणाली अवलंबली परंतु गुजरात,तामिळणाडू व उत्तरप्रदेश या राज्यांनी हा उपाय अवलंबला नाही.सरकारने १ जुलै २०१७ पासून देशात वस्तु आणि सेवा कर प्रणाली लागु केलेली आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील जीएसटीचे महत्व:**

जीएसटी ही एक देशातील महत्वाची अप्रत्यक्ष कराची सुधारणा आहे.हा कर लागु केल्यामुळे राज्याची व देशाची अर्थव्यवस्था सुधारणार आहे.देशातील उत्पादक,विक्रते आणि उपभोगक्त्यावर राष्ट्रीय स्थरावरून आकारलेला हा अप्रत्यक्ष कराचा प्रकार आहे.याचा इतर देशात चांगला परिणाम दिसून आलेला आहे.आपल्या देशात सरकारने द्विमार्गी कर प्रणालीचे प्रारूप अवलंबलेले' आहे.या प्रारूपानुसार १) एसजीएसटी(स्टेट गुड्स अॅण्ड सर्व्हिस टॅक्स)राज्य वस्तु आणि सेवा कर-हा कर राज्य सरकार गोळा करणार आहे.२) एसजीएसटी(सेंट्रल गुड्स अॅण्ड सर्व्हिस टॅक्स) केंद्रीय वस्तु आणि सेवा कर-हा कर केंद्र सरकार गोळा करणार आहे.३) आयजीएसटी (इंटीग्रेटेड गुड्स अॅण्ड सर्व्हिस टॅक्स)एकीकृत वस्तु आणि सेवा कर-हा कर केंद्र सरकार गोळा करणार आहे.देशातील विविध प्रकारचे व्यवहार व आर्थिक सेवा हा कर येण्याआधी सेवा कराअंतर्गत १५ टक्क्याच्या आसपास होत्या.त्यांची या कर प्रणाली नुसार विभागणी ५%,१२%,१८% व २८% अशी करण्यात आली आहे.

बाहेरच्या देशातून एका केंद्रशासीत प्रदेशात माल खरेदी करून आला तर त्यावर एकीकृत वस्तु आणि सेवा कर लागेल त्यात केंद्रीय वस्तु आणि सेवा कर आणि केंद्रशासीत वस्तु आणि सेवा कर अंतरभुत असतील.तसेच बाहेरच्या देशातून देशातील कोणत्याही राज्यात मालखरेदी करून आला तर त्यावर एकीकृत वस्तु आणि सेवा कर लागेल त्यात केंद्रीय वस्तु आणि सेवा कर आणि राज्य वस्तु आणि सेवा कर अंतरभुत

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 171 (F)- Commerce
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

असतील.तसेच बाहेरच्या देशातून एका राज्यात व नंतर दूसऱ्या राज्यात वस्तु खरेदी करून आली असेल तर त्यावर एकीकृत वस्तु आणि सेवा कर लागेल त्यात केंद्रीय वस्तु आणि सेवा कर आणि राज्य वस्तु आणि सेवा कर अंतरभुत असतील.तसेच बाहेरच्या देशातून एका राज्यात व नंतर दूसऱ्या राज्यातून केंद्रशासीत प्रदेशात वस्तु खरेदी करून आली असेल तर त्यावर एकीकृत वस्तु आणि सेवा कर लागेल त्यात केंद्रीय वस्तु आणि सेवा कर आणि केंद्रशासीत वस्तु आणि सेवा कर अंतरभुत असतील.

वस्तु आणि सेवा कर प्रणालीतून मद्य(दारू),पाच पेट्रोलियम पदार्थ,तंबाखु व करमणूकीच्या बाबींना काही प्रमाणात वगळण्यात आले आहे.

हा कर देशात लागू होण्याआधी पश्चिमबंगालचे माजी अर्थमंत्री असिमदास गुप्ता यांनी पुढील प्रमाणे या कराविषयी प्रतिक्रीया दिलेली होती. आपण सगळे जण काहीशा अज्ञात दिशेत जात आहोत;पुढं काय असेल याचा थोडा फार अंदाज सगळ्यांनाच आहे.परंतु माघारी पेक्षा पाऊल पुढं टाकून एकदा हा प्रयोग करून पाहायला काय हरकत आहे.विद्यमान केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी यावर पुढील प्रमाणे प्रतिक्रीया दिलेली आहे.माजी अर्थमंत्री म्हणून सुचना करणं सोप आहे;पण अर्थमंत्री म्हणून जीएसटी लागू करणं ही डोकेदुखीच आहे!

**वस्तु आणि सेवा कराचे फायदे:**

१) व्यापाऱ्यांना अनेक करापासून मुक्ती
२) उपभोक्त्यांना सोपी कर पद्धती
३) देशभर वस्तूंच्या एकच किमती
४) वस्तूची निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्याला सोपी पद्धती
५) राष्ट्रीय बाजारपेठेचा विकास
६) कर प्रणालीतील पारदर्शकता
७) सोपी कर प्रणाली
८) रोजगारीच्या वाढत्या संधी
९) कमी प्रमाणात कर देणाऱ्यांना फायदेशीर
१०) स्वयंभू कर प्रणाली
११) काळ्या पैशावर लगाम
१२)उपभोगाच्या प्रमाणात कर
१३) निर्यातीवर कोणताही कर नाही

**भारतीय अर्थव्यवस्थेतील जीएसटीचे परिणाम:**

क्लिअर टॅक्स या वित्तीय क्षेत्रातील कंपनीच्या १२ जून २०१७ च्या अंदाजानुसार नवीन कर प्रणालीमुळे ग्राहकांच्या दृष्टीकोणातून पाहीले तर त्याला काही महत्वाच्या वस्तु आणि सेवावर जास्त कर द्यावा लागत आहे.लघुउद्योजकांना व व्यापाऱ्यांना या करामुळे त्रास सहन करावा लागत आहे.स्थुल आर्थिक दर्शकावर या कराचा मध्यम कालावधीसाठी चांगला परिणाम झाला आहे.महागाई कमी होण्यास मदत झाली आहे.या कराच्या माध्यमातून सरकारकडे मोठ्या प्रमाणात महसूल जमा झालेला आहे.त्यामुळे वित्तीय तुट काही प्रमाणात आटोक्यात येऊ शकते.निर्यात व्यापार वाढलेला आहे.परदेशी गुंतवणूकीत वाढ झालेली आहे.

याच कंपनीच्या ३१ जानेवारी २०१८ च्या माहीती नुसार देशात मार्च २०१४ रोजी १२,७६,८६१ सेवा क्षेत्रातील मोठ्या कंपन्या होत्या त्यापैकी ५० कंपन्यांचा देशात एकूण जमा झालेल्या करात जवळ-जवळ ५०टक्के वाटा या कंपन्यांचा होता.त्यात आय.टी.क्षेत्रातील,दुरसंचारक्षेत्रातील,विमा क्षेत्रातील व बँक व वित्तीय क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश होता.ई कॉमर्स क्षेत्र या कर रचनेवर नाराज आहे.औषध उत्पादन क्षेत्राला पुढील काही वर्षात वृद्धीची आशा आहे.दूरसंचार क्षेत्रात व कापड उद्योगात या करामुळे चांगला परिणाम दिसून येत आहे.बांधकाम व स्थावर संपदा क्षेत्रात मात्र या करामुळे नाराजीचा सुर आहे.

**समारोप:**

भारतात लागू झालेली जीएसटी कर प्रणाली ही महत्वकांक्षी योजना आहे.तिचा लाभ मात्र सर्वांना पुढील काळात होईल अशी अपेक्षा आहे.ही पद्धती किचकट असली तरी अप्रत्यक्ष कराचा सर्वाधीक भार वाहणारी प्रणाली असल्याने सर्वसामान्य माणसाला त्यातून कदाचीत दिलासा मिळेल अशी अपेक्षा वाटते.जीएसटी कौन्सीलच्या विविध बैठकींच्या फेऱ्यातून पुढील काळात कर व त्याचे दर यावर तोडगा निघेल अशी आशा वाटते.त्यामुळे जी क्षेत्रे मंदावली आहेत ती क्षेत्रे बांधकाम क्षेत्राच्या अनुभवावरून पुढील काळात भरभराटीला येतील आशा वाटते.

**संदर्भ:**

१. पी.चिदम्बरम,माजी अर्थ व ग्रहमंत्री,भारत सरकार.विजयानंतरची वाट,दैनिक लोकसत्ता,मंगळवार दि.९ ऑगस्ट२०१६
२. जयंत पाटील, माजी अर्थ व ग्रामविकासमंत्री,महाराष्ट्र राज्य.वस्तू व सेवा कर आवश्यकच,पण..दैनिक लोकसत्ता,रविवार २८ ऑगस्ट२०१६
३. अनंत बागाईतगार,प्रसिध्द स्तंभ लेखक,जीएसटी:एकच बाजार;एकच कर,दैनिक सकाळ ७ ऑ२०१६
४. डॉ.जी.एन.झामरे(२०११)भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र,पिंपळापुरे अँण्ड कं.पब्लिशर्स,नागपूर.
५. डॉ.विजय कविमंडन(१९९०) विकासाचेअर्थशास्त्र आणि नियोजन,श्री.मंगेश प्रकाशन,नागपूर.